BRL 2021-22 (2) 32.2

Smt. Sindhutai Jadhav Maha. Mehkar 330



किंमत : 80/-

<u>मुख्य संपादक</u>
डॉ. लाहोरकर बालाजी रंगनाथराव
प्राचार्य, श्रीमती सिंधुताई जाधव कला व विज्ञान महाविद्यालय, मेहकर, जिल्हा. बुलडाणा.

<u>मुख्य कार्यकारी संपादक</u>
श्री देशपांडे श्रीपाद यशवंतराव
अभ्यासगट सदस्य, बालभारती पुणे.

<u>मानद संपादक व सल्लागार मंडळ</u>
- डॉ. प्रविणकुमार पाईकराव
प्राध्यापक DIET नांदेड.
- डॉ. अशोक गिनगिने
प्राध्यापक S.R.T.M.U. नांदेड
- श्री शंकर राजपूत
अभ्यासगट सदस्य, बालभारती पुणे.

<u>व्यवस्थापकीय संपादक</u>
- डॉ. शेख एम. डब्ल्यू. एच.
अभ्यासगट सदस्य, बालभारती पुणे.
- श्री. सिराज अनवर म. मिरान
अभ्यासगट सदस्य, बालभारती पुणे.

संपर्क
मुखपृष्ठ संकल्पना - श्री. मुनाफ पटेल
मुखपृष्ठ - उमेद प्रिंटर्स अॅन्ड पबलिकेशन
अक्षर जुळणी - श्री. मुनाफ पटेल
वार्षिक वर्गणी : 500

नोट : सदरील मासिकात छापून आलेले लेख हे लेखकाची व्यक्तीगत अभिव्यकती आहे, लेखसंबंधी काहीही तक्रार किंवा कॉपीराईट उल्लंघन असल्यास केवळ लेखकच जबाबदार आहे, यात मासिकाचे मंडळ व छपाई यंत्राना कसल्यास स्वरुपात जबाबदार नाही याची नोंद घ्यावी. कोणतीही न्यायालयीन बाब नांदेड जिल्हा न्यायालयातच वैध असेल.

**कार्यकारी संपादकाचे दोन शब्द .....**

मित्रांनो नमस्कार,

ASIAN JOURNAL OF MULTIDISCIPLINARY RESEARCH STUDIES हे JOURNAL ग्लोबलयाजेशन ने भारत देशाला केलेली मदत आणि भारताने या संधीचा जगासाठी केलेला उपयोग या पार्श्वभूमीवर आपल्या हाती देतांना होणारा मनस्वी अत्यानंद गगनात मावेनासा झाला आहे. भारतीय शिक्षण क्षेत्रात नियोजन, भूमिका आणि कौशल्ये याचे सुसूत्रीकरण जागतिक पातळीवरील भारताचे स्थान लक्षात घेता मौल्यवान ठरणे आणि टिकून राहणे आम्हा शिक्षण सेवकांच्या दृष्टीने आदय कर्तव्य आहे.

नवागत पिढीच्या संस्था आणि त्यांचे नवागत विद्यार्थीवृंद यांच्या पर्यन्त हा संदेश भारतीय शिक्षण क्षेत्राची आंतरराष्ट्रीय स्तरावरील व्याप्ती विस्तारण्याच्या दृष्टीने जनमानसापर्यन्त पोहचविण्यासाठी गरजेचा वाटला म्हणूनच प्रकाशनाची ही तळी उचलत आहोत.

नैतिक निर्णय क्षमता वाढविणे ; सर्वसमावेशक संसाधन व्यवस्थापन ; शाश्वत धोरण विकास / टिकावू रणनीती विकास ; उद्योजकीय विकास हे चार मूलभूत अत्यावश्यक तत्वे लक्षात घेवून ASIAN JOURNAL OF MULTIDISCIPLINARY RESEARCH STUDIES चे नियोजन आणि आयोजन करण्याचा हेतू डोळ्यासमोर ठेवून प्रस्तुत JOURNAL प्रकाशनाचा प्रपंच करीत आहोत.

आज स्पर्धेच्या युगात जग प्रवास करीत असतांना एसपीएआरडीएचएटीएमएके शैक्षणिक बुद्धिमंतांसमोर विशिष्ट प्रकारची आव्हाने ऊभी केलेली आहेत. विविध क्षेत्रातील नवनवीन विचार विकास आणि विचार

मंथन नवीन दृष्टीकोन जागृत करतील आणि प्राप्त ज्ञानामध्ये भर घालतील या हेतूने आम्ही प्रस्तुत JOURNAL च्या संपादन आणि प्रकाशनाची वाट चोखाळत आहोत.मी भारतातील आणि आशिया खंडातील सर्वच प्रतिंनिधींचे अभिनंदन करू इच्छितो कारण पीआरएएसटीयूटी JOURNAL संशोधन कौशल्यांची आणि त्या त्या क्षेत्रातील नवनवीन संस्थाच्या अन्वेषणाची उपयुक्तता सिद्ध करणार आहे.

जागतिकीकरणाच्या सद्य वातावरणामध्ये शैक्षणिक गरजांच्या प्रतिपूर्ती आणि चालना देण्याचे अतिप्रगल्भ कार्य प्रस्तुत JOURNAL करणार आहे याची मला खात्री आहे. शैक्षणिक क्षेत्राबाबतची शासनाची नवनवीन धोरणे, जगाने आपेक्षित केलेल्या गरजा आणि उत्पादंनांच्या निर्मिती क्षेत्रातील वाढ इत्यादी बाबींची



III A. Research Papers publication: Paper-065



## PEER REVIEW COMMITTEE

Our Peer review committee scrutinizes and regulates the quality of content to be published, if required the committee invites experts in the field to review and comment on manuscripts received. The manuscripts submitted to our journal first go through an initial screening by the editorial board. Those manuscripts clear the screening is sent to at least two experts for peer review. Peer reviewers independently make a recommendation to the journal editor as to whether the manuscript should be rejected or accepted (with or without revisions). The journal editor considers all the feedback from peer reviewers and makes an informed decision to accept or reject the manuscript.

| | |
|---|---|
| 1) Dr B W Somatkar, HoD English Dept. Smt Sindhutai Jadhao Arts and Science Mahavidyalaya, Mehkar. | 2) Dr Bharat Avhale, Dept of History, R Z College, Malegaon, Dist Washim. |
| 3) Dr D K Rathod, HoD Economics Dept. Gajanan Maharaj College, Borgaon Manju Tq Dist Akola. | 4) Dr D N Badar, Panjabrao Jadhao College, Mehkar. |
| 5) Dr Dilip Arjune, HoD Economics Dept., JES College, Jalna. | 6) Dr G B Ghayal, Librarian Smt Sindhutai Jadhao Arts and Science Mahavidyalaya, Mehkar. |
| 7) Dr M R Shinde, HoD Sociology Dept. Smt Sindhutai Jadhao Arts and Science Mahavidyalaya, Mehkar. | 8) Dr P H Barad, Librarian, SPM College, Chikhali, Dist Buldana. |
| 9) Dr P R Junghare, HoD History Dept. Smt Sindhutai Jadhao Arts and Science Mahavidyalaya, Mehkar. | 10) Dr R G Suralkar, HoD Political Science Dept. Smt Sindhutai Jadhao Arts and Science Mahavidyalaya, Mehkar. |
| 11) Dr Rajesh Maske, Dept of English, RA College, Washim. | 12) Dr S T Kute, HoD Economics Dept. Smt Sindhutai Jadhao Arts and Science Mahavidyalaya, Mehkar. |
| 13) Dr S V Jadhao, Panjabrao Jadhao College, Mehkar. | 14) Dr Santosh Dhamne, HoD Dept of Economics, TJ College, Washim. |
| 15) Dr Smt L R Jawale, HoD Marathi Dept., R Z College, Malegaon, Dist Washim. | 16) Dr Smt M P Khedekar, HoD Marathi Dept., Uttamchand Bagadia College, Risod, Dist Washim. |
| 17) Dr Smt S M Pawar, HoD Marathi Dept. Smt Sindhutai Jadhao Arts and Science Mahavidyalaya, Mehkar. | 18) Dr Smt V R More, HoD Home Economics Dept. Smt Sindhutai Jadhao Arts and Science Mahavidyalaya, Mehkar. |
| 19) Dr Umesh Patil, Dept of English, RDG Mahila College Akola. | 20) Dr V P Jadhao, Librarian, TJ Mahavidyalaya, Washim. |
| 21) Dr Vijay Gaikwad, Librarian, Pushpadevi Patil College, Risod, Dist Washim. | |

# Table of Contents


| Sr. No. | Title of the Article | Name of the Author | Page No. |
|---|---|---|---|
| 1 | नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 2020 - संक्षिप्त दृष्टीक्षेप | प्राचार्य, डॉ बालाजी रंगनाथराव लाहोरकर<br>श्रीमती सिंधुताई जाधव कला व विज्ञान महाविद्यालय मेहकर, जिल्हा बुलडाणा. | 01 |
| 2 | समकालीन कथा साहित्य में वृद्ध विमर्श | प्रा. धन्यकुमार जिनपाल बिराजदार,<br>हरिभाई देवकरण महाविद्यालय,<br>रेल्वे लाइन्स, सोलापुर, महाराष्ट्र 413001<br>मोबाइल : 9423330737 | 04 |
| 3 | **Problems in the Indian Education System** | डॉ. शेख एम. डब्ल्यू. एच.<br>मुख्याध्याक<br>जि. प. हायस्कूल अर्धापूर जि. नांदेड. | 08 |
| 3 | भारतातील बेकारी व अर्धबेकारीमुळे घडूण येणारे सामाजिक व आर्थिक परिणाम | डॉ. धनाजी दगडूराव खेबडे<br>यशवंतराव चव्हाण महाविद्यालय,<br>अंबाजोगाई, जि.बीड | 12 |
| 4 | समन्वय के कवि गोस्वामी तुलसीदास | डॉ. सविता तिवारी<br>सह- प्राध्यापिका<br>शासकीय महाविद्यालय (स्वायत्त) कलबुर्गी, कर्नाटक | 14 |
| 5 | अंडमान- निकोबार द्वीपों के प्रमुख आदिम आदिवासी | डॉ. एन.लक्ष्मी<br>असिस्टेंट प्रोफेसर, हिंदी<br>महात्मा गांधी राजकीय महाविद्यालय मायाबंदर, उत्तर तथा मध्य अंडमान Mobile : 943427782 | 17 |
| 6 | **Iqbal Ka Karnama Urdu Nazam Mein** | Dr. Shaikh Ateequr Rehman<br>Secondary Teacher<br>Z.P. High School, Tamsa Nanded. | 22 |






01

## नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 2020 - संक्षिप्त दृष्टीक्षेप

प्राचार्य डॉ बालाजी रंगनाथराव लाहोरकर
श्रीमती सिंधुताई जाधव कला व विज्ञान महाविद्यालय
मेहकर जिल्हा बुलडाणा.

**प्रास्ताविक:**

नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाच्या माध्यमातून तब्बल 34 वर्षानंतर 21 व्या शतकातील भारतातील पहिली शैक्षणिक सुधारणा 2020 मध्ये करण्यात आली. दिनांक 29 जुलै, 2020 रोजी विद्यमान भारतीय शिक्षण पद्धतीत विविध बदल घडवून आणण्याच्या उद्देशाने मंत्रिमंडळाने नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण सर्वमान्य केले. प्रस्तुत नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 2020/ New National Education Policy 2020 हे सन 2022 पासून लागू होणार आहे. सन 1968 मध्ये देशाचे पहिले शैक्षणिक धोरण इंदिरा गांधी सरकार मध्ये मांडण्यात आले होते, जे की,'शैक्षणिक धोरण 1964' च्या कोठारी आयोगाच्या शिफारशींवर आधालेले होते. यात शालेय शिक्षणासाठी 10+2+3 शैक्षणिक प्रणाली स्वीकारलेली होती. यासोबत त्यावेळी या धोरणात भाषेचे 'त्रिभाषा सूत्र' अवलंबण्यात आलेले होते. प्रथम भाषा मातृभाषा,द्वितीय भाषा राष्ट्रभाषा (हिंदी) आणि तृतीय भाषा म्हणून इंग्रजीचा स्वीकार या धोरणाद्वारे करण्यात आलेला होता. सर्वसाधारणपणे यासारख्याच शिफारशींवर आधारित दुसरे शैक्षणिक धोरण राजीव गांधी सरकारने सन 1986 मध्ये मांडले. या धोरणात विशेषत: भारतीय महिला, अनुसूचित जमाती आणि अनुसूचित जाती समुदायांसाठी शैक्षणिक संधी समान करण्यावर विशेष भर दिला गेला होता. पुढे सन 1992 मध्ये तत्कालीन नरसिंह राव सरकारनेया धोरणांमध्ये बदल सुचवला आणि काही सुधारणा केल्या गेल्या.

**भारतीय शिक्षण प्रणालीचा ऐतिहासिक आढावा:**

भारतीय राज्यघटनेतील राज्य धोरणाची दिशादर्शक तत्वातील भाग 4, कलम 45 आणि39(एफ) मध्ये, राज्यमान्य आणि सर्वांना न्याय्य व प्रवेश- योग्य शिक्षणाची तरतूद आहे. सन 1976 च्या बेचाळीसाव्या घटनादुरुस्तीद्वारे शिक्षणास राज्य यादीतून समवर्ती यादीमध्ये कायद्याने स्थानांतरित केले गेले. पुढे सन 2002 मधील 86 व्या घटनादुरुस्तीद्वारे मूलभूत अधिकारांच्या कलम 21-A अंतर्गत शिक्षणाला अंमलबजावणीचा हक्क बनविला.भाषा, गणित, विज्ञान, सामाजिक विज्ञान, सांख्यिकी, मानविकी, इतिहास आणि नागरिकांची राष्ट्रीय आणि घटनात्मक जबाबदारी यासारख्या काही संकल्पना विद्यार्थ्यांना शिकवण्यासाठी अनिवार्य शालेय विषयांना प्राधान्य दिले यानंतर 6 ते 14 वयोगटातील सर्व मुलांना प्राथमिक शिक्षण देण्यासाठी राईट टू एज्युकेशन (आरटीई) कायदा सन 2009पासून लागू करण्यात आला.याद्वारे सर्व शिक्षा अभियान, मध्यान्ह भोजन योजना, नवोदय विद्यालय, केंद्रीय

विद्यालय यासारख्या सरकारी उपक्रमांत समाजातील सर्व वंचित घटकांसाठी 25% आरक्षण निश्चित करण्यात आले.

**नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण2020ची पार्श्वभूमी:**

सन 2015 मध्ये तत्कालीन मनुष्यबळ विकास मंत्री स्मृती इराणी यांनी भारतीय शिक्षणात नव्या शैक्षणिक सुधारणा मान्य करण्याच्या दृष्टिकोनातून ऑक्टोबर 2016 मध्ये एक धोरण मांडले आणि त्यावर जनतेतील विविध घटकाकडून सुधारणा आणि मत मागवण्यात आले. मात्र हे धोरण काही कारणांनी मंजूर होऊ शकले नाही. या धोरण निर्मितीमध्ये टी. एस. आर. सुब्रमण्यम हे प्रमुख होते. नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 2020या धोरणासाठी माजी इस्त्रो अध्यक्ष के. कस्तुरीरंगन यांच्या अध्यक्षतेखाली कमिटी बनवून पुन्हा दुसरा प्रयत्न करण्यात आला.

**राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 2020 तील महत्वाचे मुद्दे:**

राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 2020 चे अंतिम उद्दीष्ट भारताला जागतिक ज्ञान महासत्ता बनविणे हे आहे. या धोरणाने मनुष्यबळ विकास मंत्रालयाचे नाव बदलून शिक्षण मंत्रालय ठेवले.भारतातील शिक्षण प्रणालीतील हा बदल म्हणजे सन 1947 मध्ये देशाला स्वातंत्र्य मिळाल्यापासूनचा तिसरा मोठा बदल आहे.राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 2020च्या पूर्वी सन 1968 आणि सन 1986 मध्ये शैक्षणिक प्रणालीत सुधारणा करण्यात आली होती.शालेय शिक्षणातील गुंतवणुकीमध्ये लाक्षणिक वाढ करणे नवनवीन उपक्रम राबविणे यावर राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 2020 मध्ये भर देण्यात आलेला आहे. याद्वारे सन 2025 पर्यंत इयत्ता पाचवी व त्यापुढील इयत्तेतील प्रत्येक विद्यार्थ्यास पायाभूत साक्षरता व तंत्रज्ञान आत्मसात होत असल्याची दक्षता घेण्यावर लक्ष केंद्रित करण्यात आले आहे.शालेय शिक्षणासाठी 10+2+3 ही रचना बदलून 5+3+3+4या रचनेवर आधारित बौद्धिक विकास व अध्ययनाच्या तत्त्वांवर आधारित अभ्यासक्रम व अध्यापन शास्त्र रचना विकसित करण्यावर भर देण्यात आला आहे. तसेच या धोरणात सारांशात्मक मूल्यांकनाकडून नियमित आणि रचनात्मक मूल्यांकनाकडे वळण्याची कल्पना मांडली आहे जी अधिक योग्यता- आधारित आहे

विविध शाखांनी सुसज्ज असलेल्या उच्च शिक्षण संस्थांमध्ये उपलब्ध स्तरानुसार व विषयवार राबवण्यात येणारा एकीकरण केलेला चार वर्षांचा बॅचलर ऑफ एज्युकेशन हा अभ्यासक्रम शिक्षकांना पूर्ण करणे आवश्यक केले आहे.शिक्षकांची भरती सक्षम पारदर्शक प्रक्रियेद्वारे केली जाईल. नवसंशोधनाच्या कल्पना वेगाने देशभर वितरित व्हाव्यात यासाठी नॅशनल रिसर्च फाउंडेशनची स्थापना करण्यात येईल. तसेच उच्चशिक्षणाबाबतच सांगायचे झाले तर, व्यावसायिक शिक्षणासह उच्च शिक्षणामध्ये सकल नोंदणी गुणोत्तर 26.3 टक्के (2018) वरून 2035 साला पर्यंत 50 टक्के पर्यंत वाढवण्याचे एनईपी 2020 चे उद्दिष्ट आहे.उच्चशिक्षण क्षेत्रात संरचनात्मक आणि शैक्षणिक रचनेत राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 2020 द्वारे ठसठशीत सुधारणा केल्या गेल्या आहेत. युजीसी, एआयसीटीई, एनसीटीई या संस्था





रद्दबातल केल्या कारण यासारख्या अनेक नियंत्रक संस्था असतील तर गोधळ होतो,मोठ्या प्रमाणावर सरकारीकरण होते, भ्रष्टाचार वाढतो, नोकरशाहीचा छळवाद वाढतो, म्हणून हे टाळण्यासाठी आता 'भारतीय उच्चशिक्षण आयोग/ नॅशनल एज्युकेशन कमिशन' या एकाच संस्थेचे नियंत्रण असणार आहे.राष्ट्रीय शिक्षण आयोग पंतप्रधानांच्या अध्यक्षतेखाली भारतातील शैक्षणिक दूरदृष्टीचा परिरक्षक असेल.

सन 2030 पर्यंत पूर्व- शाळा ते माध्यमिक स्तरापर्यंतचे शिक्षण 100% ग्रॉस एनरोलमेंट रेश्यो (जीईआर) सह सार्वत्रिक केले गेले आहे.दहावी आणि बारावीच्या बोर्ड परीक्षा अधिक सुलभ केल्या जातील यात केवळ तथ्ये शिकण्याऐवजी अध्ययनार्थ्यांच्या मुख्य कार्यक्षमतेवर अधिक भर दिला जाईल. या परीक्षा वर्षातून दोनवेळा घेण्यास परवानगी दिली जाईल.शाळांमधील शैक्षणिक प्रवाह, अवांतर क्रिया आणि व्यावसायिक प्रवाह यांच्यात समन्वय साधण्याचा प्रयत्न केला जाईल.ई- शिक्षणाच्या आवश्यकता पूर्ण करण्यासाठी शालेय आणि उच्च शैक्षणिक वर्गांसाठी डिजिटल पायाभूत सुविधा, शैक्षणिक सामुग्री तयार करणारे विभाग आणि डिजिटल शिक्षणासाठी समर्पित विभाग तयार केले जातील.इयत्ता सहावीपासून इंटर्नशिपसह विविध व्यावसायिक शिक्षणाची तरतूद या धोरणात केली गेली आहे.मातृभाषा तसेच प्रादेशिक भाषा इयत्ता 5 वी पर्यंत शिक्षण देण्यासाठी वापरली जाईल आणि कोणत्याही विद्यार्थ्यांवर कोणतीही भाषा सक्तीने लादली जाणार नाही.

उच्च शिक्षणातील अंडरग्रेजुएट कोर्स 3 ते 4 वर्षांच्या लवचिक अभ्यासक्रमासह एकापेक्षा अधिक एक्झिट ऑप्शन्ससह आणि वेगवेगळ्या स्तरावर डिप्लोमा / प्रमाणपत्रांसह दिले जातील. वेगवेगळ्या उच्च शिक्षण संस्थांकडून मिळवलेल्या शैक्षणिक उपलब्धी डिजिटली संग्रहित करण्यासाठी अकॅडेमिक बँक ऑफ क्रेडिट ची स्थापना केली जाईल जेणेकरून माहिती हस्तांतरित करता येईल आणि अंतिम पदवी मिळवल्यावर त्याची गणना केली जाईल.संशोधनातील एम.फिल अभ्यासक्रम बंद केले जातील.वैद्यकीय आणि कायदेशिक्षण वगळता संपूर्ण उच्च शिक्षणासाठी 'उच्च शिक्षण आयोग' (एचईसीआय) ची स्थापना केली जाईल. सार्वजनिक आणि खासगी दोन्ही उच्च शिक्षण संस्था समान निकषांद्वारे संचालित केल्या जातील, या एचईसीआय मध्ये - 1) शिक्षण प्रणालीतील नियामक चौकटीची देखभाल करण्यासाठी राष्ट्रीय उच्च शिक्षण नियामक परिषद (एनएचईआरसी), 2) सर्वसाधारण शैक्षणिक परिषद हि शिक्षण प्रणालीतील (जीईसी) मानक सेटिंग्जच्या देखरेखीच्या कामासाठी असेल, 3) शिक्षण संस्थांना वित्तपुरवठा करण्यासाठी उच्च शिक्षण अनुदान परिषद (एचईजीसी)हे कार्य करेल आणि 4) अधिस्विकृत मान्यता मिळवण्यासाठी नॅशनल एक्रिडिटेशन कौन्सिल (एनएसी) असे चार स्वतंत्र विभाग असतील.

येत्या 15 वर्षात महाविद्यालयांची विद्यापीठ संलग्नता प्रणाली पुसून टाकली जाईल

आणि महाविद्यालयांना श्रेणीबद्ध स्वायत्तता देण्याची यंत्रणा राबविली जाईल. भविष्यात प्रत्येक महाविद्यालयाचा स्वायत्त (पदवी देणारे) महाविद्यालय किंवा विद्यापीठाचा घटक म्हणून विकसित होणे या धोरणात अपेक्षित आहे.

**समारोप:**

शिक्षणाचे आंतरराष्ट्रीयीकरण संस्थात्मक सहकार्यातून केले जाऊ शकते. तसेच विद्यार्थी आणि शिक्षक यांच्या देवाणघेवाणीचा विचार करून करता येवू शकतो. त्यामुळे आपल्या देशामध्ये जगामधल्या अव्वल क्रमांकाच्या विद्यापीठांना प्रवेशाची परवानगी देण्यात येईल. बाहेरच्या सर्वोत्कृष्ट विद्यापीठांना आपल्या देशात कॅम्पस उघडता येणार आहेत.तसेच शिक्षण क्षेत्रातील सार्वजनिक गुंतवणूक वाढवून जीडीपीच्या 6% पर्यंत लवकरात लवकर पोहोचवण्याचे उद्दिष्ट सुद्धा या समाविष्ट केले आहे.

**संदर्भ:**

https:/ / www.education.gov.in/ sites/ upload_ files/ mhrd/ files/ nep/ 2020

02

## समकालीन कथा साहित्य में वृद्ध विमर्श

प्रा. धन्यकुमार जिनपाल बिराजदार,
हरिभाई देवकरण महाविद्यालय,
रेल्वे लाइन्स, सोलापुर, महाराष्ट्र 413001
मोबाइल : 9423330737

सन 1960 के बाद रचनाकार समाज का दायित्व निभाते हुए कलम चलाते रहें। सन 1960 के परिवर्ती समाज का प्रतिनिधित्व करने वाला साहित्य 'समकालीन साहित्य' कहलाता है। 1960 के बाद की कविता को साठोत्तरी कविता या समकालीन कविता के नाम से अभिहित किया जाने लगा। आखिर समकालीन शब्द का अर्थ क्या है। किसी व्यक्ति के जीवन काल में प्रत्यक्ष या परोक्ष रूप में घटित घटना समकालीन घटना है। उससे प्रभावित होकर वह जो अभिव्यक्त करता है, उसे समकालीन रचना कहते हैं। विश्वंभर नाथ उपाध्याय जी ने कहा है, " समकालीन कविता में जो हो रहा है 'बिकमिंग' का सीधा खुलासा है। इसे पढ़कर वर्तमान काल का बोध हो सकता है क्योंकि उसमें जीते, संघर्ष करते, लड़ते, तड़पते, गरजते तथा ठोकर खाकर सोचते वास्तविक आदमी का परिचय है। "

प्रत्येक व्यक्ति के जीवन में आने वाला अंतिम पड़ाव जो किसी के लिए सुखद तो किसी के लिए पीड़ादायक होता है, जहाँ बदलती जीवन शैली तथा उपभोक्तावादी विचार ने अपना प्रभाव छोड़ा है, वह है वृद्धावस्था एक ओर जीर्ण शरीर, बढ़ती हुई बीमारियाँ तो दूसरी ओर वैश्वीकरण तथा रोजगार के कारण अपने भी पराये



Coordinator - IQAC
Smt.Sindhutai Jadhao College
Mehkar.Dist.Buldana